# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांकः07.11.2025** **वारः शुक्रवार**

---

•वंदे मातरम् गीताच्या शतकोत्तर सुवर्णमहोत्सवाचं आज पंतप्रधानांच्या हस्ते उद्घाटन

•राज्यातील विविध शैक्षणिक संस्था आणि शासकीय आस्थापनांमध्ये आज वंदे मातरमचं समूह गायन

•पुण्यातील कोरेगाव पार्क जमीन व्यवहार प्रकरणी चौकशी समिती स्थापन केल्याची मुख्यमंत्र्यांची माहिती

•आणि

•20 षटकांच्या चौथ्या क्रिकेट सामन्यात भारताचा ऑस्ट्रेलियावर ४८ धावांनी विजय; मालिकेत 2-1नं आघाडी

**<u>वंदेमातरम</u>**

देश प्रेमाचं प्रतीक असलेल्या वंदे मातरम् गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाचं उद्घाटन आज दिल्लीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणार आहे. सांस्कृतिक मंत्रालयाच्या वतीनं या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. देशभरात या निमित्त वर्षभर विविध कार्यक्रम होणार आहेत. या कार्यक्रमात पंतप्रधानांच्या हस्ते विशेष टपाल तिकीट आणि नाण्याचं प्रकाशन होणार आहे.

मुंबईत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत मंत्रालयातल्या त्रिमूर्ती प्रांगणात आज सकाळी १० वाजता 'वंदे मातरम्'चं समूहगान होणार आहे. वंदे मातरम् 'सार्ध शताब्दी' महोत्सवाच्या माध्यमातून पुढील वर्षभर राज्यभरात कौशल्य विकास विभागाच्या वतीनं विविध कार्यक्रम होणार असल्याची माहिती मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी दिली.

राज्यातील विविध शैक्षणिक संस्था आणि शासकीय आस्थापनांमध्येही आज 'वंदे मातरम्' गीताचं समूहगान आयोजित करण्यात येणार आहे.

वंदे मातरम् गीताच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवाचा एक भाग म्हणून पुण्यात आज एका विशेष कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं आहे. यावेळी संगीत आनंदमठ नाटकाचा प्रयोगही सादर होईल, तसंच वंदे मातरम् ग्रंथाचं प्रकाशनही होणार आहे. वंदे मातरम गौरव समितीच्या वतीने पुण्यात उद्या वंदे मातरम गौरव यात्रा काढण्यात येणार आहे.

वंदे मातरम् गीताचे संशोधक आणि संगीत संग्राहक मिलिंद सबनीस यांनी आकाशवाणीशी बोलताना वंदे मातरम् गीताचं महत्त्व विशद केलं, ते म्हणाले

बाईट-मिलिंद सबनीस –1 मिनिट 10 सेकंद

वंदे मातरम् गीताचे संशोधक आणि संगीत संग्राहक मिलिंद सबनीस यांची विशेष मुलाखत आज रात्री ८ वाजता दिल्लीवरुन प्रसारित होणार आहे.

**<u>सितारामन</u>**

जीएसटी म्हणजेच वस्तू आणि सेवा करातल्या सुधारणांना करदात्यांकडून सुरुवाती पासूनच उत्तम प्रतिसाद मिळत असल्याचं केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी म्हटलं आहे. भारतीय स्टेट बँकेच्या वतीनं मुंबईत आयोजित १२व्या बँकिंग आणि अर्थशास्त्र परिषदेत त्या काल बोलत होत्या. आर्थिक समावेशनात बँकांनी महत्त्वाची भूमिका बजावली आहे असं त्या म्हणाल्या.

**<u>केंद्रीयकृषिमंत्री</u>**

केंद्रीय कृषि मंत्री शिवराज सिंह चौहान आज छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याच्या एक दिवसाच्या भेटीवर येणार आहेत. या भेटीत चौहान, कृषि आणि ग्रामीण विकास योजनेच्या अंमलबजावणीचा आढावा घेणार असून, स्थानिक शेतकऱ्यांशी संवाद साधणार आहेत. तसंच पूरग्रस्त भागांची पाहणी देखील करणार आहेत.

**<u>सीडब्लूपीआरएस</u>**

किनारपट्टी, बंदरं आणि महासागर अभियांत्रिकी या विषयावरील दोन दिवसांच्या राष्ट्रीय परिषदेला काल पुण्यात खडकवासला इथल्या केंद्रीय जल आणि विद्युत संशोधन संस्थेत सुरुवात झाली. दीनदयाळ बंदर प्राधिकरणाचे अध्यक्ष सुशील कुमार सिंह यांच्या हस्ते या परिषदेचं उद्घाटन झालं. भारताच्या विकासासाठी समुद्राचा प्रभावी वापर आवश्यक आहे. यासाठी बंदरांचे आधुनिकीकरण, तंत्रज्ञानाचा वापर आणि स्थानिक नागरिकांचा सहभाग महत्त्वाचा आसल्याचं मत सुशील कुमार सिंह यांनी यावेळी व्यक्त केलं. न्यू मंगलोर बंदराचे अध्यक्ष डॉ. वेंकट रमण अक्कराजू, सीडब्लूपीआरएस चे संचालक डॉ. प्रभात चंद्रा आणि भारतीय हवामान खात्याचे वरिष्ठ शास्त्रज्ञ के.सी. साईकृष्ण यावेळी उपस्थित होते.

**<u>जमीन</u>** घोटाळा

पुण्यातल्या कोरेगाव पार्क इथल्या कथित जमीन गैरव्यवहार प्रकरणी महसूल आणि भूमिअभिलेख विभागाकडून संपूर्ण माहिती मागवली असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. या प्रकरणात चौकशी करून अनियमितता आहे की नाही, हे पडताळून पाहिलं जाईल आणि अनियमितता असेल तर दोषींवर कठोर कारवाई केली जाईल असंही ते म्हणाले. त्यांनी काल नागपूरात माध्यमांशी संवाद साधला. पुण्यातील कथित जमीन गैरव्यवहार प्रकरणी पार्थ पवार यांच्यावर आरोप करण्यात आले आहेत. दरम्यान या प्रकरणी मुख्यमंत्र्यांनी चौकशीचे निर्देश दिले असून तहसीलदार आणि दुय्यम निबंधकाचं निलंबन करण्यात आलं आहे. अतिरिक्त मुख्य सचिव विकास खारगे यांच्या अध्यक्षतेखाली चौकशी समिती स्थापन करण्यात आली आहे.

दरम्यान, या प्रकरणाचा आपल्याशी काहीही संबंध नाही मात्र या प्रकरणाची पूर्ण माहिती घेऊन माध्यमांसमोर वस्तुस्थिती ठेवू अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी काल मुंबईत वार्ताहरांशी बोलताना दिली.

**<u>ठाकरे</u>**

माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी काल धाराशिव जिल्ह्यात शेतकऱ्यांशी संवाद साधला. मराठवाड्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात नुकसान झालं आहे, त्यामुळे शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये मदत मिळायला हवी असं ठाकरे म्हणाले. शेतकऱ्यांची कर्जमाफी करू असं आश्वासन देऊन महायुती सत्तेवर आली, मात्र दिलेलं आश्वासन पाळलं नाही, अशी टीका ठाकरे यांनी यावेळी केली.

बिहार मतदान

बिहार विधानसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात काल 64 पूर्णांक 66 शतांश मतदानाची नोंद झाली. १८ जिल्ह्यातल्या १२१ मतदारसंघासाठी एकंदर १ हजार ३१४ उमेदवारांचं भवितव्य काल मतदान यंत्रात बंद झालं. दुसऱ्या टप्प्यात १२२ मतदारसंघांमधे येत्या ११ नोव्हेंबरला मतदान होणार आहे.  या निवडणुकीची मतमोजणी १४ नोव्हेंबरला होईल.

**Intro**

**खड्डे मुक्तपुणे**

पुणे महापालिकेतर्फे शहरात खड्डेमुक्त रस्ते अभियान सुरू करण्यात आलं आहे. या माध्यमातून महापालिकेच्या जुन्या हद्दीतील सर्व रस्ते लवकरच खड्डे मुक्त होतील अशी माहिती उपायुक्त आणि पथ विभागाचे प्रमुख अनिरुद्ध पावसकर यांनी आकाशवाणीशी बोलताना दिली. ते म्हणाले

**ग्लोबल पुलोत्सव**

समाजाचा विचार करणारे चिंतनशील भाष्यकार, साहित्यिक आणि राजकारणावर परखडपणे भाष्य करणारे पु. ल. देशपांडे; हे महाराष्ट्राच्या सांस्कृतिक पटलावरील महत्त्वाचे घटक आहेत, असे गौरवोद्गार ज्येष्ठ नाटककार सतीश आळेकर यांनी काल पुण्यात काढले. ग्लोबल पुलोत्सवाचं उद्घाटन करताना ते बोलत होते.

ज्येष्ठ व्यंगचित्रकार शि. द. फडणीस यांनी पुलंच्या 75व्या वाढदिवसा निमित्त त्यांच्यावर काही व्यंगचित्र रेखाटली होती; या व्यंगचित्रांचं अनावरण करून या महोत्सवाचं उद्घाटन झालं. पुलंच्या बहरूपी कारकिर्दीवर, 1994मध्ये प्रदर्शित झालेला, ‘या सम हा’ लघुपटही यावेळी दाखवण्यात आला.

**सांगली**

सांगलीतल्या कृष्णा नदीवर आयर्विन पुलाला समांतर असलेल्या नवीन पुलाचं उद्घाटन काल पालकमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते झालं. आयर्विन पूल अवजड वाहनांसाठी धोकादायक झाल्यामुळं  या पुलावरून काही  वर्षापूर्वी वाहतूक बंद करण्यात आली होती.

**कुष्ठरोगरुग्ण**

राज्य शासनानं २०२७पर्यंत कुष्ठरोगमुक्त महाराष्ट्राचं उद्दिष्ट ठेवलं आहे. त्या पार्श्वभूमीवर राज्यात कुष्ठरोगाचा प्रसार रोखण्यासाठी आणि रुग्णांना वेळेत उपचार मिळावेत, या उद्देशाने राज्य शासनाने कुष्ठरोगाला नोटिफायबल डिसीज म्हणजेच सूचित करण्यायोग्य आजार म्हणून घोषित केलं आहे. कुष्ठरोगाचं निदान झालेल्या रुग्णांची नोंद दोन आठवड्यांच्या आत संबंधित जिल्हा आरोग्य कार्यालय, सहाय्यक संचालक, आरोग्य सेवा, कुष्ठरोग, तसंच स्थानिक नागरी आरोग्य अधिकाऱ्यांकडे करणं आता सर्व डॉक्टर आणि आरोग्य संस्थांसाठी बंधनकारक आहे.

**<u>क्रिकेट</u>**

ऑस्ट्रेलियात कॅररा इथं काल झालेल्या 20 षटकांच्या चौथ्या सामन्यात भारतानं ऑस्ट्रेलियावर ४८ धावांनी विजय मिळवला. ऑस्ट्रेलियानं नाणेफेक जिंकून भारताला प्रथम फलंदाजीसाठी आमंत्रित केलं. भारतानं निर्धारित २० षटकात ८ गडी बाद १६७ धावा केल्या. या धावसंख्येचा पाठलाग करताना ऑस्ट्रेलियाचा संघ ११९ धावात गारद झाला. या विजयामुळे पाच सामन्यांच्या या मालिकेत भारतानं २-१ अशी आघाडी घेतली आहे.

**<u>हवामान</u>**

मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात काही ठिकाणी किमान तापमानात वाढ झाली आहे. येत्या दोन दिवसात कोकण आणि मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे. या काळात इतरत्र हवामान कोरडं राहिल.

# आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं.